"पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे सुधारणा चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
मानव्यविद्याशाखे अंतर्गत इतिहास
विषयातील पीएच.डी. पदवी करीता सादर
करावयाच्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधक

प्रा.मिलींद बाबूराव थोरात

इतिहास विभाग,
भोगावती महाविद्यालय, कुरुकली
ता.करवीर जि. कोल्हापुर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. व्ही.के.साखरे

संशोधन मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर विभाग,
इतिहास संशोधन केंद्र,
श्री. शिवाजी कॉलेज, कंधार,
ता.कंधार, जि.नांदेड.

जुलै - २०१९

पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे सुधारणा चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

१.१ प्रस्तावना :

१९ वे शतक हे भारतीय इतिहासात महत्त्वपूर्ण शतक मानले जाते. या शतकात भारतात राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सुधरणा करण्यासाठी सुशिक्षित भारतीयांनी रचनात्मक प्रयत्न करण्यास प्रारंभ केला. भारतात सामाजिक व धार्मिक जीवनात अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा, रुढी निर्माण झालेल्या होत्या. सांप्रदायिक इर्ष्या व द्वेष, जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता, बालविवाह, जरुठ-कुमारी विवाह, सतीप्रथा, बालहत्या, समुद्र यात्रा निषेध, विधवा विवाहास बंदी, धार्मिक कर्मकांड, मूर्तीपूजा, अंधविश्वास इ. चा प्रसार भारतीय समाज जीवनात मोठ्या प्रमाणात झालेला होता. अशा सामाजिक व धार्मिक परिस्थितीत सुधारणा घडवुन आणण्यासाठी आधुनिक भारतीय सुधारकांनी विशेष असे प्रयत्न केले. या चळवळीला आधुनिक भारतीय प्रबोधन (The Renaissance in Modern India) या नावाने ओळखले जाते.

भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ ही सामान्यता: दोन भागात विभागलेली आहे. पहिल्या भागात ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि अलीगढ चळवळ यांचा समावेश करता येईल. ज्यांनी आपल्या क्षेत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या भागात आर्य समाज, रामकृष्ण मिशन, देवबंद चळवळ यांचा समावेश होतो. ज्यांनी पुनर्नवीकरण (Revivalism) चळवळ केली आणि आपल्या समाजाचा पुनरुद्धार केला. ह्या दोन्ही प्रकारच्या चळवळी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करतांना दिसतात. या चळवळीचा आणखी एक पैलु आहे, तो म्हणजे या चळवळींना 'सामाजिक चळवळ' किंवा 'धार्मिक चळवळ' अशा प्रकारे स्पष्ट भाग करता येत नाहीत. या दोन्हीने एकमेकांना प्रभावित केलेले दिसून येते. भारतीय समाज मनावर प्राचीन काळापासून धर्माचा फार मोठा प्रभाव राहिलेला आहे. त्यामुळे धर्मात दोष निर्माण झाले की, त्याचा परिणाम समाजावर झालेले आढळून येतात. म्हणजे धर्म आणि समाज यांचा जवळचा संबंध राहिलेला आहे. त्यामुळे १९ व्या शकतकातील समाजसुधारकांनी धर्म सुधारणेवर जास्त भर दिलला दिसतो. 'धर्मसुधारणा म्हणजेच समाजसुधारणा' या तत्त्वाचा स्वीकार भारतीय समाजसुधारकांनी केलेला दिसुन येतो.

१.२ संशोधन विषयाची निवड :

संशोधन कार्याला सुरुवात करण्यासाठी संशोधन विषयाची निश्चिती करणे आवश्यक असते. ज्यामुळे संशोधनाला एक दिशा प्राप्त होते. सामाजिकशास्त्रात विषय निवडीला 'समस्या सुत्रण' असेही म्हणतात. संशोधनाला योग्य न्याय व दिशा मिळावी म्हणून संशोधन विषयाची निवड ही समस्या सुत्रणाने होत असते. कोणत्याही शास्त्रीय संशोधनात सर्वप्रथम संशोधनाचा विषय निवडला जातो. ऐतिहासिक संशोधनाची सुरुवात देखील विषय किंवा समस्येच्या निवडीपासून होत असते.

भारतीय संस्कृती ही नावलौकिक झालली संस्कृती आहे. या संस्कृतीने अनेक मूल्य, तत्त्वे, आदर्श यांचे सृजन केले आहे. यामुळे भारतीय संस्कृतीची जगाच्या इतिहासात विशिष्ट अशी वेगळी ओळख आहे. पण या आदर्श संस्कृतीत काळाच्या ओघात काही अनिष्ट प्रथा, चालीरीती सामील झाल्या. याचा परिणाम संस्कृती व समाज जीवनावर झाला. त्याचे दोष १८-१९ व्या शतकापर्यंत अस्तित्वात होते. १९ व्या शतकात अनेक सामाजिक-धार्मिक सुधारणेच्या चळवळी निर्माण झाल्या. त्यांनी समाजातील अनेक सामाजिक-धार्मिक समस्यांवर आपले विचार , लेखन व कृतीद्वारे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. त्यातून भारतात अनेक सामाजिक-धार्मिक सुधारणेच्या चळवळी निर्माण झाल्या. या चळवळी संस्थात्मक व वैयक्तिक अशा स्वरुपाच्या होत्या. वैयक्तिक स्वरुपात सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी करणाऱ्या महान व्यक्तींमध्ये करण्यात पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते.

आधुनिक भारताच्या सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीमध्ये पं.ईश्वरचंद्र विद्यासागर यांची महत्त्वाची कामगिरी आहे. त्यांनी आयुष्यभर विविध सुधारणांचा पुरस्कार केला होता. ते महान समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, तत्त्ववेत्ते, लेखक होते. गरीब, दलित, स्त्रिया यांचे संरक्षक म्हणून त्यांना ओळखले जाते. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर स्वतः संस्कृत भाषेचे पंडीत होते. तरी देखील त्यांनी आधुनिकतेचे महत्त्व ओळखत इंग्रजी भाषेतील शिक्षणाचे समर्थन केले. स्त्रियांची मूळ समस्या असणाऱ्या बालविवाहाला त्यांनी विरोध करुन प्रौढ विवाहाचा स्वीकार केला. 'कुलीनवाद' या प्रथेमुळे समाजात बहुपत्नीत्वाची पद्धत रुढ झाली हेती. त्यांनी या प्रथेबाबत अनेक दोष पाहिल्याने ही पद्धत बंद करण्यासाठी प्रयत्न केले. विद्यासागर यांनी स्त्री शिक्षणाचे समर्थन करुन मुलींना मोफत शिक्षण दिले. त्यांनी शाळा व

कॉलेजमध्ये मागास जातीतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न केले. सामाजिक सुधारणांप्रमाणेच त्यांनी शैक्षणिक सुधारणा करण्यावर भर दिला. 'द हिंदु मेट्रोपोलिटन इन्स्टीट्युट' या नावाच्या संस्थेच्या माध्यमातुन शैक्षणिक कार्याचा प्रसार केला. ब्रिटीशांनी केलेला विधवा पुनर्विवाह कायदा-१८५६ या कायद्यासाठी मोठी जनजागृती केली. या कायद्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष विधवांचे पुनर्विवाह घडवुन आणले. अशा विविध क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. ते केवळ बोलके सुधारक नव्हते तर आपल्या विचारांना अनुसरुन प्रत्यक्ष कार्य करणारे कृतीशील समाजसुधारक होते. आयुष्यभर त्यांनी सामाजिक-धार्मिक, शैक्षणिक सुधारणा चळवळीशी एकनिष्ठता ठेवली. पण त्यांच्यावर आतापर्यंत सर्वव्यापी संशोधन झालेले नाही. झालेच असले तरी सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीच्या दृष्टीकोनातून झालेले नाही. त्यांचे सर्वांगीण कार्य ऐतिहासिक दृष्टीकोनातून शोधणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधकाने "पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे सुधारणा चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास" या संशोधन विषयाची निवड केली.

१.३ संशोधन विषयाची उद्दीष्ट्ये :

संशोधन विषय निश्चित केल्यानंतर संशोधन कार्याचे उद्देश निश्चित करणे आवश्यक ठरते. उद्देश निश्चित केल्यामुळे संशोधनाला योग्य दिशा मिळते. उद्दिष्टांच्या निर्धारणाशिवाय संशोधन कार्य केले जाऊ शकत नाही. म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाचे उद्देश पुढीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

१. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या जीवन-चरित्राचा मागोवा घेणे.

२. स्त्री शिक्षणासाठी पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी केलेले प्रयत्न व कार्य यांचा आढावा घेणे.

३. विधवा पुनर्विवाह कायदा-१८५६ व विधवा पुनर्विवाहासाठी पं. विद्यासागर यांनी केलेल्या कामगिरीचे अध्ययन करणे.

४.बालविवाह, बहुविवाह, अस्पृश्यता यांना विरोध करुन पं. विद्यासागर यांनी स्वीकारलेल्या मानवतावादी कार्याचे योगदान अभ्यासणे.

५.पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी 'द हिंदू मेट्रोपोलीटन इन्स्टीट्यूट' च्या माध्यमातुन केलेल्या कामगिरीचा आढावा घेणे.

६. एक शैक्षणिक सुधारक व विचारवंत म्हणून पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांची भूमिका अभ्यासणे.

१.४ संशोधनाची गृहितकृत्ये :

संशोधन विषयाच्या संदर्भात काही अनुमान असतात. संशोधनाच्या माध्यमातून ज्या प्रश्नांच्या उत्तराचा शोध घेतला जाणार आहे. त्याचे काही संभाव्य उत्तर संशोधकाला माहिती असते. संशोधक त्या संभाव्य उत्तरावर लक्ष केंद्रीत करतो. त्यामुळे गृहितकृत्यांची मांडणी करावी लागते. यानुसारच प्रस्तुत विषयाची काही गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

१. अत्यंत खडतर, प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या जीवन-चरित्राची जडण-घडण झाली होती.

२. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी सामाजिक-धार्मिक सुधारणा करण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील सुधारणांचा पुरस्कार केला.

३. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी शाळा स्थापन करुन मुलींना मोफत शिक्षण दिले.

४. ब्रिटीशांनी विधवा पुनर्विवाह कायदा करावा म्हणून पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली.

५. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी अनेक विधवांचे पुनर्विवाह घडवुन आणले.

६. बालविवाह, बहुविवाह, अस्पृश्यता या सामाजिक अन्यायाविरुद्ध मानवतावादी भूमिका त्यांनी स्वीकारली.

७. 'द हिंदू मेट्रोपोलीटन इन्स्टीट्यूट' च्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणांचे कार्य केले.

१.५ संशोधन विषयाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधनातून पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे भारतीय प्रबोधन चळवळीतील योगदान याचा अभ्यास केला जाणार आहे. त्यांच्या कार्याची ओळख होऊन संशोधन कार्यास महत्त्व निर्माण होईल. यामुळे प्रस्तुत संशोधन कार्याची उपयुक्तता किंवा महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

१. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी १९ व्या शतकात केलेले कार्य, कार्यपद्धती प्रतीकुल परीस्थिती याची जाणीव होईल.

२. आधुनिक भारतातील सामाजिक-धार्मिक-शैक्षणिक चळवळी संबंधित संशोधन करणाऱ्या (M.Phil., Ph.D., Post Doctorate) संशोधकास हा प्रबंध मार्गदर्शक ठरेल.

३. या संशोधनातून तत्कालीन समाजात कार्य करतांना येणाऱ्या अडचणी, प्रतीकूल परिस्थिती त्यावरील उपाय योजना यांसबंधी वर्तमान परिस्थितीत कार्य करणाऱ्या N.G.O., सामाजिक कार्यकर्ते, शासकीय धोरणे यांना दिशादर्शक असेल.

४. प्रस्तुत विषयावर आजपर्यंत कुणीही सर्वांगीण संशोधन केलेले नाही. त्यामुळे संबंधित विषयावर संदर्भ उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. शासकीय नोकरीत राहून सुद्धा समाजसेवा व समाजकार्य करता येते याची जाणीव पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्यावरील प्रस्तुत संशोधनातून होईल.

६. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्त्रियांना मानवी हक्क प्राप्त करुन देण्यासाठी जो संघर्ष केला होता तो प्रस्तुत संशोधनातुन समजून येईल.

७. समाजसुधारकांचा अभ्यास व आवड असणाऱ्या जिज्ञासु अभ्यासकांना हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

१.६ संशोधन पद्धती :

संशोधनात संशोधन पद्धती हा विषयाचा गाभा असतो. कोणतेही संशोधन शास्त्रीय पद्धतीने केलेतरच त्याचा उपयोग होतो. अन्यथा चूकीच्या पद्धतीवर आधारलेल्या संशोधनातून चुकीचे निष्कर्ष निघतात. प्रत्येक विषयात संशोधनाच्या वेगवेगळ्या पद्धती असतात. संशोधन पद्धती ही सिद्धांत, उद्देश, स्वरुप, संशोधन विषय यावर अवलंबून असते. प्रस्तुत संशोधनाचा विषय "पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे सुधारणा चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास" असा आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन हे संशोधनाच्या विविध प्रकारांपैकी गुणात्मक संशोधन प्रकारातील असुन त्यासाठी या संशोधन पद्धतीतील 'ऐतिहासिक संशोधन पद्धती' चा अवलंब करण्यात येईल. ऐतिहासिक संशोधन पद्धतीतील 'व्यक्ती अभ्यास' या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

१.७ व्याप्ती व मर्यादा :

इतिहास या विषयाची व्याप्ती खुप मोठी आहे. हा विषय व्यापक असलातरी त्या विषयाचा सर्वांगीण घटकांचा अभ्यास करणे शक्य नाही. याची जाणीव ठेवून समाजसुधारक 'पंडित ईश्वर चंद्र विद्यासागर' हा व्यक्ती अभ्यास निश्चित केला आहे. पं.ईश्वरचंद्र विद्यासागर हे १९ व्या शतकातील सुप्रसिद्ध साहित्यिक, लेखक, विद्वान होते. ते अनेक विद्यापारंगत होते. त्यांनी बंगाली व बंगाली लिपीचे सुलभीकरण केले. त्यांना आधुनिक बंगाली गद्याचे जनक

समजले जाते. ते बंगाली व संस्कृत भाषेतील विद्वान होते. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी आयुष्यभर विविध क्षेत्रात भरीव योगदान दिले. त्यापैकी केवळ सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक याद्वारे प्रबोधन चळवळीत केलेल्या कामगिरी यापुरतेच मर्यादीत आहे. हीच या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा असणार आहे.

१.८ संशोधनाचा कालावधी :

संशोधन हि सतत चालणारी प्रक्रिया आहे. यात कधीही खंड पडत नाही. पण संशोधनात वस्तुनिष्ठता येण्यासाठी संशोधकाने कालावधी निश्चित करुन घ्यावा लागतो. प्रस्तुत संशोधनाचा कालावधी हा इ.स. १८२० ते इ.स. १८९१ असा राहिल.

१.९ संशोधन आराखडा :

संशोधन कार्य यशस्वी पूर्ण करण्यासाठी संशोधन पद्धती बरोबरच संशोधन आराखड्याची निर्मिती करणे आवश्यक असते. यामुळे संशोधन कार्याला एक निश्चित दिशा प्राप्त होते. संशोधन कार्य सुलभ व सोपे होते. श्रम, वेळ आणि पैसा वाचतो. संशोधन आराखड्यामुळे हाती घेतलेल्या कार्यात सुसूत्रीपणा येतो. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश "पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे सुधारणा चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास" या विषयाचे वर्णन असल्याने संशोधन विषयानुसार वर्णनात्मक संशोधन आराखडा (Descriptive Research Design) अवलंब करण्यात येईल.

१.१० संदर्भ साहित्याचा आढावा :

संशोधन करतांना संदर्भ साहित्याचा आढावा विशिष्ट उद्देश ठेवून घेतला जातो. संशोधन विषय निवडी पासून ते अहवाल लेखनापर्यंत संदर्भ साहित्याचा उपयोग होतो. याच्या आढाव्याने संशोधकास संशोधन विषयासंबंधी अद्यावत राहतो. प्रस्तुत संशोधकाचा "पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे सुधारणा चळवळीतील योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास" हा संशोधन विषय आहे. त्यानुषंगाने या संदर्भात उपलब्ध असलेल्या व प्राप्त होऊ शकणाऱ्या साहित्याचा आढावा घेतला जाईल. त्यातील प्रमुख व महत्त्वाच्या संदर्भ साहित्याची नोंद संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे घेतली आहे.

1. Mitra Indra, (2001), Karunasagar Vidyasagar, Ananda Publishers, Calcutta.
2. Chakravati Haripada, (Ed.), (1981), Vidyasagar Smaranika, Uttar Banga Visvavidyalay, Calcutta.
3. Ghuha Arabinda, (1971), Unpublished letters of Vidyasagar, Reba Ghuha,Calcutta.
4. Haldar Gopal, (1972), Vidyasagar : A Reassessment, People's Publishing House, New Delhi.
5. Roy Ananta Kumar, (1921), Vidyasagar : The Great Indian Educationist & Philanthropist, Ray & Co., Calcutta.
6. Sen Asok, (1977), Iswar Chandra, Vidyasagar & His Elusive Milestones, Riddhi-India, Calcutta.
7. Mitra Subal Chandra, (1975), Isvar Chandra Vidyasagar, Ashish Publishing House, New Delhi.
8. Lal Mohan, (2006), Ishwarchandra Vidyasagar, The Encyclopaedia of Indian Literature, Sahitya Akademi, Delhi.
9. Chaturvedi B.K., (2004), Ishwarchandra Vidyasagar, Diamond Books (P.) LTD., New Delhi.
10. Bose S.K.,(1969), Ishwarchandra Vidyasagar, National Book Trust India, New Delhi.
11. Tripathi Amales, (2004), Vidyasagar, The Traditional Moderniser, Punascha Publisher, Calcutta.

१.११ संदर्भ साधने :

ऐतिहासिक संशोधनात गतकालीन मानवी जीवनाचा आढावा घेतला जातो. त्यासाठी विविध साधनांची आवश्यकता असते. साधनाशिवाय इतिहास संशोधन प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. साधनांच्या आधारावरच संशोधनाची मांडणी होऊन निष्कर्ष मांडले जातात. संदर्भ साधनांचे प्राथमिक स्त्रोत (Primary sources) व दुय्यम स्त्रोत (Secondary sources) यांचा असे दोन प्रकार आहेत. प्रस्तुत संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी प्राथमिक साधने व दुय्यम साधने यांचा आधार घेतला जाईल.

१.१२ सैद्धांतिक दृष्टीकोन :

ऐतिहासिक संशोधन करत असतांना निश्चित असा सैद्धांतिक दृष्टीकोनाचा स्वीकार करणे आवश्यक असते. यानुसार संशोधन विषय हा पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांची सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीचा आढावा आहे. त्यांची कामगिरी ही थॉमस कार्लाईल यांनी व्यक्त केलेल्या, "इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तीची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय." या मताशी मिळती-जुळती आहे. यानुसार इतिहासात प्रतिभेला फार महत्त्व आहे. सामान्य माणूस कायमच्या रुळलेल्या मार्गाने जातो. परंतु काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या प्रतिभेच्या (Genius) जोरावर संपुर्ण समाजाची दिशा बदलतात. थॉमस कार्लाईल यांनी मे १८४० मध्ये सहा व्याख्याने दिली होती. त्यातून विविध श्रेष्ठ, महान व्यक्तींची महिमा वर्णनीत केली आहे. या व्याख्यांवर आधारीत इ.स. १८४१ मध्ये जेम्स फ्रासेर(Jems Fraser) यांनी 'On Heroes, Hero-Worship & The Heroic in History' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात थॉमस कार्लाईल यांनी 'Heroes & Hero-Worship' हा सिद्धांत मांडून इतिहासात महान व्यक्तींचे जीवन-चरित्र व कामगिरी असते असे स्पष्ट केले. या सैद्धांतिक बैठकीवर प्रस्तुत संशोधन आधारीत असेल.

१.१२ प्रकरण नियोजन :

प्रस्तुत संशोधन विषयाचे प्रकरण नियोजन पुढीलप्रमाणे असेल.

प्रकरण पहिले - संशोधन पद्धती

शोधप्रबंधाच्या या पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन पद्धतीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे - संदर्भ साहित्याचा आढावा

शोधप्रबंधाच्या या दुसऱ्या प्रकरणात संशोधन विषयाच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे - पं.ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे जीवन व चरित्र

शोधप्रबंधाच्या या तिसऱ्या प्रकरणात समाजसुधारक पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या जीवन व चरित्राचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण चौथे - पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे स्त्री सुधारणा कार्ये

शोधप्रबंधाच्या या चौथ्या प्रकरणात पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्त्रियांसाठी केलेल्या सुधारणा कार्याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे शैक्षणिक योगदान

शोधप्रबंधाच्या या प्रकरणात पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे शैक्षणिक योगदान अभ्यासण्यात येईल.

प्रकरण सहावे - सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या उपरोक्त प्रकरणांचा आढावा घेऊन मिळालेली संशोधन माहिती सारांश स्वरुपात मांडणी करुन निष्कर्ष देण्यात येतील.

संदर्भग्रंथसूची :

1. पांडेय शिवप्रसाद, (2000), पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, प्रकाशक - छात्र हितकारी पुस्तकमाला, प्रयाग.
2. भोला रचना, (२०१२), ईश्वरचंद्र विद्यासागर, विद्या विहार, नई दिल्ली.
3. आगलावे प्रदीप,(२०००) संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्याप्रकाशन, नागपूर.
4. कुऱ्हाडे बी.एम.,(२००७), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
5. वेलणकर जयंत,(१९८८), प्रबंध कसा लिहावा, साहित्य प्रकाशन प्रसार केंद्र, नागपूर.
6. देव प्रभाकर, (१९९७), इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.
7. कोठेकर शांता, (२००५), इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
8. गायकवाड आर.डी., सरदेसाई, हनमाने, (१९९६), इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
9. बेल्हेकर एन.के.,(अनु.), (२००३), आधुनिक भारताचा इतिहास : एक नवीन मूल्यांकन, एस.चन्द आणि कं. दिल्ली.
10. सरदेसाई बी.एन.,(२००५), इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
11. Ghosh S.C.,(2000), The Histroy of Education in Modern India 1757- 1998, Orient Longman, New Delhi.
12. Stark H.A.,(1916), Varnacular Education in Bengal from 1813 to 1912, General Publishing, Calcutta.
13. Hatcher Brian A., (2014), Vidyasagar : The life & After life of an Eminent Indian, Routlege Taylor & Francis Group, New Delhi.
14. Kumar Manish, (2007) Ishwar Chandra Vidyasagar, Prabhat Prakashan.
15. Sarkar Sumit & Tanika Sarkar, (2008), Women & Social Reform in Modern India, Indiana University Press, Indiana (U.S.A.).

16.Hatcher Brian A., (2008), Idioms of Improvement : Vidyasagar & Cultural Encounter In Bengal, Oxford University Press.

17.Patil Godavari D., (2000), Hindu Widows: A Study in Deprivation, Gyan Publishing House.

18.Bajaj S.k., (2001), Recent Trends in Histriography, Anmol Pub., New Delhi.

19.Jaiswal Pradip, (Ed.), (2008), Research Methodology in History, Omega Pub., New Delhi.

20. Lal I., (2008), Research in History, Swastik Pub., Delhi.

21. Mahajan V.D., (2004), Modern Indian History, S. Chand & Company, Ltd., New Delhi.

22. Chaudhary Avishek, (2017), A Tribute to Ishwar Chandra Vidyasagar, International Education & Research Journal (IERJ), Vol.3, Isue 4.

23. Banu Aktar & Alam Shafiqul,(2017), Contribution of Ishwar Chandra Vidyasagar in the field of Education , AARJSH Research Journal, Vol.04, Issue 3.

24. Banu Aktar & Alam Shafiqul, (2016), Influence of western knowledge & culture upon Ishwar Chandra Vidyasagar, IJEPR Research Journal, Vol. 05, Issue 2.

संशोधक

प्रा.मिलींद बाबूराव थोरात
इतिहास विभाग,
भोगावती महाविद्यालय, कुरुकली
ता.करवीर जि. कोल्हापुर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. व्ही.के.साखरे
संशोधन मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर विभाग,
इतिहास संशोधन केंद्र,
श्री. शिवाजी कॉलेज, कंधार,
ता.कंधार, जि.नांदेड.